कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२५-२६/१२८२
दि. २५/०८/२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे "प्रतिभा" ही संगीत सभा शनिवार दि.२३ ऑगस्ट २०२५ रोजी कला अकादमीच्या कृष्णकक्षात संपन्न झाली. "संगीत सभेतून विद्यार्थ्यांना व्यासपिठ उपलब्ध करुन देताना सोशल मिडीया तंत्रज्ञानाचा वापर करुन विद्यार्थ्यांना जास्तीस जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन सदस्य सचिव श्री. शंकर गांवकर यांनी केले." या कार्यक्रमांत प्रमुख पाहूणे या नात्याने ते उपस्थित होते. सर्व प्रथम प्रमुख पाहूण्याच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. त्याच्यासोबत हिदुस्थानी संगीत व नृत्य विभागाच्या संचालीका डॉ. सपना नाईक तसेच श्री. सुभाष फातर्पेकर, श्री. रविंद्र गांवकर, श्री. गोविंद शिरोडकर व संगीत विभागाचे इतर अध्यापक वर्ग उपस्थित होते.

उद्‌घाटनाच्या कार्यक्रमानंतर सर्वप्रथम कु. वंशिका प्रियोळकर हीचे शास्त्रीय गायन झाले. तीने राग बागेश्रीमध्ये ताल तीनतालात दृत बंदिश सादर केली. त्यांना श्री भार्गवराम गर्दे यांची तबलासाथ व श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथसंगत लाभली. तद्‌नंतर वाळपई संगीत केंद्रातील विद्यार्थी कु. वामन च्यारी यांचे तबला सोलो वादन झाले. त्यांनी ताल तिनतालामध्ये तबल्यातील विविध रचना सादर केल्या त्यांना श्री शुभम नाईक यांची नगमासाथ लाभली. तबला वादनानंतर कु. सुरज मळीक व कु. विजय सावंत यांचे संवादिनी सहवादन झाले. त्यांनी विलबिंत एकतालात राग तोडी सादर केला व त्याला जोडून तिनतालात एक रचना सादर केली. त्यांना श्री. श्रीपाद च्यारी यांची तबला साथसंगत लाभली. तद्‌नंतर बासरी वादनाच्या कार्यक्रमात कु. गोविदा फडते यांनी मध्यलय झपताल व त्यालाजोडून दृत तीनतालात राग वृंदावनी सारंग सादर केला.

बासरीवादनानंतर कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमात कु. गौरक्षा साळसकर, कु. पियु निमकर, कु. तानिया चोपडेकर व कु. हर्षिता च्यारी या विद्यार्थीनींनी कथ्थक नृत्य सादर केले त्यांना सौ. वरदा बेडेकर यांची पढंतचीसाथ तसेच श्री. गीतेश मांद्रेकर यांची तबलासाथ व श्री. शुभम नाईक यांची संवादिनीसाथ लाभली व शेवटी कार्यक्रमाचा समारोप भरतनाटयम् नृत्याने झाला. त्यामध्ये कु. प्रतिका मराठे, कु. मंजु महाले. कु. चैत्राली काला, कु. अमिषा अडकोणकर, कु.

जान्हवी म्हांबरे, कु. मनवी गावस, कु. सौम्या नाईक, कु. अदिती अनिष, कु. सुहानी नाईक, कु. अंतरा नाईक, व कु. श्रीवल्ली शिरोडकर या विद्यार्थीनींनी भरतनाटयम् नृत्य सादर केले. त्यांना डॉ. सपना नाईक यांची नटवंगमची साथ तसेच डॉ. दिप्ता रुबसुंदरम् यांची गायनसाथ व विद्वान श्री. डि. आर. चेथनमुर्ती यांची मृदंगमची साथ लाभली.

संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. वरदा बेडेकर व सौ. मंदिरा तिरोडकर यांनी केले तर श्री. भार्गवराम गर्दे यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी सर्व पालक व रसिक श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)